# National e-Conference

On

*"The Impact of Digitization on Education and Educational Policies, Social Media, Human Behavior and Social Interaction during COVID-19"*

*On*

***14 – 15 July, 2020***

**Organized by**

***Dr. L. D. Balkhande College of Arts and Commerce***
***Pauni, Dist. Bhandara***

**Editor**

**Dr. Anil Kosamkar**
Organizing Secretary

Scanned with OKEN Scanner

| Sr.No. | Name of the paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 27 | Effect of COVID-19 on the Indian Economy and Supply Chain | Dr. Sudhir Godghate | 134 |
| 28 | Impact of COVID – 19 On Unemployment and Digital Era: A Study | Prof. Santosh Sahu | 143 |
| 29 | Impact of COVID-19 On Banking sector and Digital Era: A study | Dr. Gajanan Babde | 151 |
| 30 | Impact of COVID-19 on Economical Perspective in Digital Era: A study | Dr. Vijay R. Bagde | 160 |
| 31 | Psychological problems in Digital era | Pruthviraj D. Khobragade | 166 |
| 32 | आधुनिक विश्व में मानसिक स्वास्थ्य समस्या, चुनौतियाँ और समाधान | डॉ. दीपा बलखंडे | 172 |
| 33 | बेरोजगार और प्रवासी समस्या | श्रीमती अंजु ए. शरण | 180 |
| 34 | वैश्विकीकरण में संगीत शिक्षा की नयी टेक्नोलॉजी | प्रा. डॉ. अस्मिता नानोटी | 185 |
| 35 | कोरोना काल में हिन्दी साहित्य पर प्रभाव | डॉ. स्वर्नलता वागडे | 190 |
| 36 | ग्रामीण महिला एवं मिडिया | डॉ. विजय शंकरराव दिघोरे | 195 |
| 37 | कोविड–१९ और बेरोजगारी | डॉ. प्रदीप एच. गजभियें | 200 |
| 38 | कोविड १९ के परिणामस्वरूप भारतीय शास्त्रीय संगीत के सांगीतिक पक्षों में पड़ रहे प्रभाव | प्रा. डॉ. श्वेता दीपक वेगड | 203 |
| 39 | भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार आणि स्थलांतर | डॉ. वासंती निचकवडे | 207 |
| 40 | कोविद १९ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराशी असलेला मानसशास्त्रीयसंबंध | डॉ. अल्का संजय कोल्हे | 212 |
| 41 | कोरोना कालांतर्गत संगीत शिक्षण प्रणाली आणि सादरीकरणामध्ये तंत्रज्ञानाचे योगदान | वैखरी वझलवार | 218 |
| 42 | भारतापुढील बेराजगारीची आव्हाने | प्रा.नंदकिशोर प्रेमचंद सिंगाड | 222 |
| 43 | भारतातील युवा बेरोजगारी आणि कोविड–१९ | प्रा. मिथुन गं. देशपांडे | 227 |
| 44 | 'कौटूंबिक कलह किंवा हिंसाचार' | डॉ. अरूणा एस. थुल (देवगडे) | 230 |
| 45 | Covid – 19 : Impact of Health and Yoga | Dr. Sanghamitra Chauhan | 236 |
| 46 | कोव्हीड–१९ कोरोना लॉकडाऊन दरम्यानचा स्थलांतरितांचा प्रवास – एक अध्ययन | प्रा. डॉ. नंदा पांगुळ | 241 |
| 47 | बालक – महिला सक्षमीकरण आणि शिक्षण | डॉ. रेखा वडिखाये | 248 |
| 48 | महिला व बाल सक्षमीकरण | प्रा.विलास मेश्राम | 254 |
| 49 | स्थलांतर आणि बेरोजगारी | डॉ. निशा अशोक कळंबे | 260 |
| 50 | राष्ट्र विकासात शिक्षकांची भूमिका | प्रा.उज्वला स. नवले | 266 |
| 51 | कोविड १९ व मानसिक आरोग्य | प्रा. किरण चिकाटे | 273 |
| 52 | कोविड.१९ व शिक्षणात होणारे बदल | डॉ. जे. एस. हटवार | 279 |
| 53 | महिला सक्षमीकरण : एक आढावा (महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना) | प्रा. अरुण आलेवार | 285 |
| 54 | कोविड १९ चा सामाजिक व अर्थिक जीवनावर झालेला परिणाम | डॉ. लालचंद किसन रामटेके | 292 |


Scanned with OKEN Scanner

# 'महिला व बाल सक्षमीकरण'

प्रा.विलास मेश्राम
सहाय्यक प्राध्यापक
डॉ. एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस्,
ॲन्ड कॉमर्स, पवनी, ता.पवनी,जि.भंडारा

**प्रस्तावना :**

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या निभावत आहेत. प्राचीन काळाचा विचार केला तर असे दिसून येते की, पुरानामध्येही स्त्री शक्तीला वंदन केले आहे. स्त्री ही अनादी काळापासून शक्ती स्वरुपात आहे. बदलत्या परिस्थितीत त्याची परिभाषा जरूर बदलली आहे. राक्षसांचा संहार असो वा आणखी कोणतेही कठीण काम असो स्त्री अग्रणीय आहे. असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. तसेच महिला मोठया प्रमाणात सामाजिक असमानता व अत्याचार, आर्थिक परावलंबित आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात. अनादी काळापासून महिलावरील ही बंधने त्यांच्या वैयक्तिक आणि व्यवसायिक विकासाच्या आड येत आहेत. म्हणूनच महिला व बाल सक्षमीकरणाची भारतासारख्या देशाला गरज आहे.

आज अनेक महिला डॉक्टर, इंजिनियर, नेता, अभिनेत्री, मंत्री, देशाच्या सर्वोच्च पदावर देखील आहेत. त्याचवेळी दूसरीकडे गावात अनेक स्त्रिया मुलांना जन्म देताना मरतात. हुडयांच्या अभावी जळतात, पण त्यांना न्याय मिळत नाही. त्यांची बातमी ही वर्तमानपत्रात झळकत नाही. त्यांच्या अधिकारासाठी आंदोलन होत नाही? असे का? जर आपण सर्वांगीण विकासाच्या गोष्टी करतो, तर हया स्त्रियांचा विकास करणे ही आपली जवाबदारी नाही का? आत्मविश्लेशन केल्यास ही जवाबदारी आपली आहे, यांची जाणीव ही आपल्याला होईल. त्यांचा मागासण्याचं कारण आम्ही काही अंशी आहोतच. हया प्रश्नांना सोडविण्यासाठी आंदोलनचं रुप दयावच लागेल. आपल्या जीवनक्रमात एक दिवस तरी समजासाठी द्या. जर हे प्रश्न आज सोडवू शकलो नाही तर हे असेच कायम राहतील. म्हणून या स्त्रियांचे अश्रु कायमचे बंद करायचे असतील तर त्यासाठी गरज आहे महिला सक्षमीकरणाची.

**सक्षमीकरण म्हणजे काय :**

मानवसमूहात स्त्रिजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांसी हतोत्साहित करणारे वर्तन त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांच्या छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हिनत्वाची वागणूक स्त्री जातीला मिळत राहिली आहे. हा भेदभाव दूर करुन स्त्रियांचा प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे सुचालन करणे आणि लैगिंक समतेद्वारे समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टीकोण, केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री समक्षीकरण असे म्हणता येईल.

बदलत्या परिस्थितीत मात्र स्त्रिची भूमिका बदलली आहे. ती मुलगी, सून, पत्नी, माता हया भूमिका व्यतिरिक्त अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, कर्मचारी, मालक अशा अनेक रुपांनी आहे. तिच्या जीवनाला अनेक पैलू लाभले आहेत. आणि त्यांना अधिक चमक तिने आपल्या कर्तृत्वाने दिली आहे. आपल्या बुध्दीला आत्मसन्मानाला तिने नवीन दिशा दिली आहे.



Scanned with OKEN Scanner